# सच्चा नाना



काही व्यक्तिमत्व अशी असतात की कोणत्याही परिस्थितीत, कितीही कठीण प्रसंगात ती आपला मुळ धर्म, स्वभाव सोडत नाहीत. नाना पाटेकर हा त्यातलाच एक, सच्चा माणूस. पराकोटीचं दारिद्र्य आणि नंतर आलेली सुबत्ता या दोन्ही वेळी आतला माणूस नानाने सतत जागता ठेवला. त्याचे नाटक, सिनेमे गाजत असताना बॉलीवूडचे नट नट्या जसे नखरे करतात तसे नानाने कधी केले नाहीत. जे काही असेल ते सरळ, साधं, सोप. अभिनायाचं जबरदस्त अंग असलेला हा अभिनेता तोंडाला रंग फासून क्वचीतच सेटवर गेला असेल. भुमिका जगणारा आणि अभिनय हे काम नसून विरंगूळा आहे असं म्हणणारा नाना म्हणूनच अख्ख्या भारतीय सिनेजगतात उठून दिसतो.

नाना मातीत पाय असणारा कलावंत आहे. पुण्याजवळ आजूबाजूला जंगल असलेल्या त्याच्या गावातल्या घरात तो रहातो. निसर्गाशी एकरूप होतो. दुरदर्शन संच, वर्तमानपत्र, मोबाईल असल्या साधनांपासून स्वतःला आवर्जून दूर ठेवतो आणि हे करत असताना कलेची उपासना करतो. आपल्यातलाच माणूस शोधतो. एकाच वेळी बाळासाहेब ठाकरे आणि बाबा आमटेंवर पराकोटीचं प्रेम करतो. ‘‘माझी ओंजळ अजून छोटीच आहे” असं म्हणून अनेक संस्थांना कोणताही गाजावाजा न करता आर्थिक मदत करतो. (आनंदवनात त्याने केलेल्या मदतीतून इमारत उभी राहिली, पण त्याचा उल्लेख कुठेच नको असं नानाने सांगितलं हे मी विकास आमटेंच्या तोंडून ऎकलं तेव्हा थक्क झालो होतो.)

आज हे लिहिण्याचं कारण म्हणजे आयबीएन लोकमतवर ‘ग्रेट भेट’ मध्ये काल रात्री नाना पाटेकरची एक छान मुलाखत ऎकली. आजही ती दुपारी बारा वाजता पुन्हा ऎकता येईल. जरूर ऎका आणि नानाचा सच्चेपणा अनुभवा. (नाना खरच मोठा माणूस त्याला अरे तूरे करण्याचा उद्देश नाही, पण सचिन तेंडुलकर, गावस्कर ही माणसं देव माणसं वाटतात. तसं गणपतीलाही आपण अहो जाहो कुठे करतो?)

- नरेन्द्र प्रभू

http://prabhunarendra.blogspot.com

http://shabdshabd.blogspot.com/